Vol 3 Issue 7 Jan 2014 ISSN No :2231-5063

International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

## Welcome to GRT

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest,Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.net**

Golden Research Thoughts
ISSN 2231-5063
Impact Factor : 1.9508(UIF)
Volume-3 | Issue-7 | Jan-2014
Available online at www.aygrt.isrj.net

GRT

# पु. शि. रेगे यांची प्रेमकविता

**Koti Santosh Vijaykumar**

Assistant Professor

***सारांश*** **:-**स्त्री ही रेग्यांच्या काव्याची प्रेरक शक्ती, स्त्री रूपांमधूनच विश्वातील चैतन्य विलसताना दिसते. स्त्रीच्या अनेक प्रकारच्या रूपांचे गोंदण त्यांची प्रतिभा गोंदवते. ते गोंदण कधी बालिकेच्या रूपात, कधी पूर्ण स्त्री; कधी शहनाज, कधी पांचाली, कधी नर्तिका; तर कधी रात्रीच्या रुपांत अंतरमनाला नुसतेच जाणवते. इतके होऊनही तिचे अप्रुप संपत नाही म्हणून रेषांच्या रूपांत तिला पल्लवित केले जाते. कविमन आपल्या तरल भावनांमधून स्त्रीला विपुलांगी बनवते व वेगवेगळ्या मन:कीडेत तिला भोगत स्वांतसुखाय होते. रेग्यांची ही भावस्थिती 'साधना आणि इतर कविता' नंतर म्हणजे १९३४ च्या पुढे-मागे सुरू होऊन १९७० च्या आसपास 'अनीह' च्या चाहूलीने भंग पावते. 'अनीह' संग्रहातील रेगे, दोन्ही-रचना आणि संवेदनस्वभावाच्या अनुषंगाने वेगळे आहेत. अनीह संग्रहामधील कविता तुलनेत पसरट; चित्त शरिरावरून निघून; स्वमनावरून निघून परमनावर एकाग्र झालेले दिसून येते, ज्याचा शोध रेगे घेते होते.

## *प्रस्तावना :*

रेग्यांची प्रेमाविषयीची हुरहूर १९३२ नंतर संपते. बाबन्नकशी अस्सल अनुभवाचे वेगळेपण 'हिमसेक' ते 'प्रियाळ' पर्यंतच्या कवितेमधून नजरेत भरते. प्राचीन काव्यातील राधाभाव व राधाबंध त्यांच्या काव्यात सर्जकतेने उतरलेला दिसतो. बेधुंद प्रेमवृत्ती, निशेष समर्पणाची ओढ, त्यातील कामकीडासौंदर्यासक्ती, परस्परांच्या भावव्युहाला व देहसौंदर्याला न्यास देण्याची सहृदयता व देहाला कृतकृत करणारी धास्वादकता रेग्यांच्या सलील शब्दांत ओथंबलेली आहे. स्त्रीरूप इतक्या सर्वांनी ओढलेले, आच्छादलेले होते - रेग्यांच्या प्रतिभाधर्माला, त्यांच्या संवेदनस्वभावाला.

रेग्यांच्या कवितेत प्रिया, पत्नी-कांता-कामिनी यांची रूपे उठावदार आणि सौंदर्यपूर्ण अशी आहेत. 'पुष्कळा', 'रेषा', 'रात्र असावा', 'रात्र अशी', 'लंपट ओले वस्त्र होऊन', 'कमलदलासम', 'दाणे डाळिंबीचे' इत्यादी कवितांमधून अपूर्व अशा स्त्रीप्रतिमा घडविल्या आहेत. या स्त्रीप्रतिमां आज मिथक झाल्या आहेत. त्यांच्यामधील देहस्वीपण अत्यंत अलवार असे बनले आहे. आस्वाद घेत आस्वाद देणाऱ्या पुरूषमनाच्या उत्कटावस्थेमधील या प्रतिमा आहेत. पुरूषमनातील रत्युत्कट व रत्युत्सुक भावना त्यांमधून प्रकट होतात. दर्शनाने, स्पर्शाने अंगमनात तरंग उत्पन्न व्हावेत, ती अनुभूती 'रेषा', 'पुष्कळा' या कवितांमधून येते.

'रेषा' या नरिस शब्दांमधून संपूर्ण स्त्री तिच्या अंगसंवेदनासह रेषामय होते. या रेषा रक्तमांसांचे लवचिक तंतू होऊन संवदेनांनी अंगभर उसळत असलेल्या दिसतात. लेण्यातील शिल्पित स्त्रीला उद्देशून केलेली ही कविता. रेषासारख्या रूक्ष, कोरड्या शब्दांमधून स्त्रीचे मूर्तरूप दिसते. एवढेच नव्हे तर तिच्या विद्युलयतेच्या हालचाली दिसतात. तिच्या तनुवेलीवरून संवेदनांचे तरंगच्या तरंग उसळतात. तिच्या चापल्यासकट, विभ्रमांसकट रेग्यांनी तिला सावयव साकारली आहे:

"रेषा. . /मिळत्या, उलगडत्या,/उमजत्या,/अवखळ साखळल्या/मोकळ्या"

प्रकाश आणि सावली यांचा खेळ लेण्यांमध्ये असावा. प्रकाशकिरणांमुळे शिल्पित स्त्रीचे अंग भविमनास रेषारेषांनी दृष्टीस पडले असावे. पण त्यामधून स्वत:च्याच अंगाविषयी उत्सुक असलेली, त्या विषयी कुतूहल असलेली यौवनोत्फुल्ल स्त्री कविमनास दिसते. कविमनाच्या स्पर्शाने ती उसळत, साकळते. 'मी तर इथली नवी नवेली गात्रे गात्रे चैत्रपालवी' असा तिचा नवथर उमाळा आवेगाने हालचाली करू लागतो. तारूण्यसुलभ सलज्ज अशी कृती रेग्यांनी अचूकरित्या धरली, आणि तेही भावविरहीत मुग्ध शब्दांमधून मिळत्या, उलगडला, उमजत्या, अवखळत्या, साखळत्या हे शब्दविरोध आरेगी संवेदना

दाखविणारे आहेत. ही तिची पहिली उत्सुक भावस्थिती. तिच्या दुसऱ्या भावस्थितीत शारीरधिटाई दिसते:

"हलकेच हिंदोळल्या, / लवचित गिरकींत, / घन संयत घोळविल्या, /
भरलेपण भरहर्षे, / भोगविल्या"

देहाची आरास दृष्टीस येते. ती स्वतःच स्वच्छंदपणाचा आनंद घेत आहे. दैदिक उन्मादाला संयतपणाने घोळवित हिंदोळत आहे ती. आपले अंगप्रत्यंग तिने आता जाणून घेतले आहे. अंगाच्या भरलेपणाची सुध्दा तिला जाणीव होते. भरलेपण म्हणजे हाडामांसाची पुष्टता नव्हे, तर तनामनाची आसासून लागलेली अनिवार ओढ होय. 'भरलेपण भरहर्षे भोगवित्या' या चरणात ती ओढ ध्यानात येते. अनेक भावनांचे इंद्रधनुष्य तिच्या देहस्वीतेमधून गोफ धरलात. अवखळ, साखळ, हलका-हिंदोळ, घनसंयत घोळ, या क्रियाविशेषणांमधून कविमनातील क्रीडावृत्ती लख्खपणे अधोरेखित होते. रेग्यांनी ते शिल्प फार रसिकतेने आस्वादिलेले असावे, असे दिसते. हे आस्वादन स्पर्श, गती, दृस्पात्म विभुल, यांद्वारे होते. अव्यक्त भावना, आनंदांच्या लहरीवरील लहरी आणि मनात उठणाऱ्या सूक्ष्म व्यभिचारी भावभावना रेग्यांनी अचूकतेने पकडल्या. मनोवस्था आणि अंगविभ्रम यांची एकमूस क्रीडा मोजक्याच शब्दांत आविष्कृत झाली.

'रेषा' मधील कविमन अत्यंत त्रयस्थ, तटस्थ आणि निर्लेप असे वाटते. शिल्पित नवांगणेच्या मनामध्ये कोणकोणत्या भावना उचंबळून आल्या, त्यांचे संयमित, नियंत्रित निरीक्षण; स्वतःला त्यामध्ये न गुंतवता केले आहे. तरीही कलात्म सौष्ठवाच्या अनुषंगाने साकारली गेली आहे. एका पुष्टयौवनेच्या शरीराचे त्रयस्थ मनःपूत निरीक्षण म्हणजे 'रेषा.' तिच्या सर्व संवेदनछटा व त्या व्यक्त करणाऱ्या शारीरविभ्रमांना कविमन व्यक्त करू शकले. स्व-शारीर थरारांव लोभावलेली आणि त्यामधील सौंदर्याचा अप्रुपतेने आस्वाद घेणारी शिल्पित स्त्री रेग्यांनी मिर्मिली. ह्यातील त्रयस्थपणामुळे त्यांनी वस्तुनिष्ठता साधू शकले आहे. त्यामुळे 'रेषा' 'व्यक्तिवाची' झाली नाही.

'पुष्कळा' ची प्रतिमा नेमकी 'रेषा' च्या उलट आहे. 'पुष्कळा' मध्ये कविमन स्वातीत होऊ शकले नाही. आत्मलोलुपता यामध्ये दिसते. कविमनातील साऱ्या पुरूषसंवेदना जागृत होऊन, बहरून आलेल्या दिसतात.

रचनेच्या अनुषंगाने 'पुष्कळा' या एकाच शब्दाच्या अनुप्रास साधून धिमी लयगती प्रकट झाली. 'पुष्कळा' एकाच शब्दाच्या पुनरावृत्तीमधून स्त्रीचा स्वभावधर्म, मनोधर्म, शरीरधर्म हृदभंगपणे प्रतीतीस आणून दिला आहे. 'पुष्कळा' शब्दाच्या अनेविध रूंदावत जाणाऱ्या अर्थछटा निर्माण होतात. हे चांगल्या आणि कसदारतेचे वैशिष्ट्य कमीत कमी शब्दामधून अर्थविवर निर्माण करणे हे भाषिक सामर्थ्य रेग्यांच्यामध्ये होते. अल्पाक्षर रमणीयत्व हा त्यांचा संवेदनस्वभावच.

"बघताना किती डोळे पुष्कळ तुझे, / देताने पुष-पुष्कळ ओळ; /
बाहू गळ्यांत पुष्कळ पुष्कळ, / पुष्कळ ऊर, /
पुष्कळाच तूं, पुष्क कळावंती, / पुष्कळ पुष्कळ पुष्कळणारी"

एक भावचित्रच आपल्या दृष्टीसमोर तरळते. 'पुष्कळा' एक उत्तम अशी भावकविताच आहे. एक तृषक तिच्याकडे गेला. तिने त्याला ओतप्रोत, भरभरून दिले. तिने त्याला काय, कसे नि किती दिले हे सांगण्याकरिता त्याच्याकडे शब्द नाहीत. तो तिचा 'पुष्कळा' असाच भावगम्य उल्लेख करतो. तिची निःशेष समर्पणशील वृत्ती त्याच्या अनुभूतीस येते. ती घ्यायचे विसरून मोकळेपणाने देत राहते. तिच्या या समर्पणाविषयी 'रेणू' कादंबरीत रेगे म्हणतात, "स्त्री बरोबर स्त्री व्हायला पाहिजे. मग स्वतःला विसरायला होतं. असं स्वतःला विसरंल म्हणजे ती एका उत्तुंग विशाल वृक्षाल वृक्षासारखी बहरून उठते. आपल्या शाखा, उपशाखांनी लपेटून घेते. आपण तिच्या मुळाशी जाऊन पोहोचतो. ती थरकते, थरारते तिच्या साऱ्या रक्तांतून दौडणाऱ्या नव्या सत्त्वाने. आपण देतो आणि ती देते दसपटीने" (रेणू:१९७३:०६) हीच 'पुष्कळा' मध्ये प्रतिमांकित झाली. 'पुष्कळणारी', 'पुष्कळवंतीन' या गुणबोधक, संख्यावाचक, भाववाचक विशेषणांद्वारे तिचे कवितेमधले बहरलेपण, उन्मुक्तपण सुस्पष्ट होते. त्यामधूनच तिच्या अंगसंवेदना त्याला लपेटून घेतात. तिचे मन, डोळे ओठ, ऊर हे अवयव त्याला आवाहन करतात. "रेग्यांच्या कवितेत स्त्रीदेहाचा प्रत्यय विशिष्ट तरल अवस्थेतून साकारला जातो. या मनोवस्थेत शरीर व मन एकवटलेले असते अनेकदा मनाकडचा कल कमी असतो. शब्दांच्या संवेद्यतेतून साकारला जाणारा रचनाबंध म्हणजे ती मनोवस्था असते. 'पुष्कळा', 'रेषा' ही बहुचर्चित कविता पहिल्या म्हणजे याचा प्रत्यय घेतो." (वसंत पाटणकर:१९९५:९३).

भावावेगाच्या आधीन होऊनही प्रत्यक्ष आविष्कारातील कला अव्यंग शिलाच्या पातळीवर उतरविण्यात तटस्थ असे कौशल्य रेग्यांनी साधले होते शब्दक्रीडा ही त्यांची कारागिरी नाही. शब्दसंवेदनेमधून निर्माण झालेली ती कलाच आहे. 'रेषा', 'पुष्कळा' या कवितेतून हे समजून घेता येईल. प्रस्करखंडातून शिल्प घडवावे तसे ते स्त्रीच्या रंगरूपासह, कळातळांसह, भावविभ्रमांसह, तिच्या थिरकण्या-उसळयासह प्रतिमेमधून साधतात. चित्रकला आणि शिल्पकला यांची रेग्यांना समज, जाण होती. या दोन मुग्ध कलांच्याप्रमाणे त्यांची शब्दक्रीडा होती. चित्रशिल्पाप्रमाणे त्यांचे शब्द मुग्ध असतात; भावमुग्ध असतात. रेगे शब्दमिती संयमाने चिरेबंदीस्त करतात. त्या शब्दांना स्थापत्याची मिती असते. मिती बदलली की शब्दांची अर्थकक्षा रूंदावत जाते; जागेची मिती विस्तारते. म्हणून 'रेषा', 'पुपकळा'यांची मिती विस्तारलेली जाणवते. त्यातील शब्द थिटे होऊन रूंद होतात.

अनेक रूपांत रेग्यांनी स्त्रीप्रतिमा पाहिली. 'रात्र असावी' मध्ये तर त्यांनी रात्रीलाच स्त्रीरूप मानले. रात्र अलवारपणे

स्त्रीसारखीच लपेटून घेते. स्त्रीच्या अनेक गोष्टी रात्रीत आहेत. हे साधर्म्य पाहून रात्रीची न्यारीच प्रतिमा रेग्यांनी निर्माण केली. रात्र स्त्रीसारखी चंचल, मोकळी, गुपितांचे ओझे वाहून नेणारी, एकटेपणात रमणारी, हलफुलकी गुजगोष्ट करणारी आणि गहनगहिऱ्या शांत डोहासारखी असते. रहस्ये कुशीत ठेवून मधाळमवाळ शब्द ओठावर घेतलेली, समंजस, गंभीर प्रौढेसारखी रात्र रेग्यांना भासते. रात्री आणि स्त्री हा विरोध्यास असतानाही रेग्यांना त्या दोहोत काही गुणसाम्ये, साधर्म्ये जाणवतातत्र रात्रीला चैतन्याचेच रूप बहाल करतात. (कुसुमाग्रजांचे चरण स्मरते:'रात्रीच्या गर्भात असे उद्याच्या उष:काल')

यांप्रमाणेच त्यांच्या कवितेमध्ये आदिमायेचीही रूपे प्रकट झाली आहेत. "रंभा मी, मेनका/क्लोओपात्रा, रूप, राधिका/चंद्रा, बकुळा/कानडी मलिका" अशी उद्घोषणा मूलस्वरातून तीच करते. रंभा, उर्वशी, राधिका, चंद्रा, बकुळा, मलिका, सरस्वती, लक्ष्मी, काली, दुर्गा, रेणुका ही ही आदिशक्तीची वेगवेगळी रूपे. "या आदिप्रतिमांना आपल्या मनाबाहेर सांस्कृतिक भावविश्वात स्थलाकालबध्द असे वस्तुनिष्ठ महत्त्व प्राप्त झालेले असते." (गंगाधर पाटील:अनुष्टुभ:जुलै–ऑगस्ट १९७८:०६) या आदिशक्तीच्या चैतन्याने भारलेल्या रूपदर्शनाने सारे जडपण संपुष्टात येते. तिच्या सौंदर्याची, मार्दवाची, अंतरंगामधल्या चैतन्यस्त्रोताची प्रतीती 'लवलव' कवितेध्ये येते. 'मस्तानी' (दोला:१९६२:११०) कवितेमध्यून शक्तिपीठाचा प्रत्यय येतो. माती आणि मस्ती या प्रतिमांमधून त्यांचे अभिन्न नाते स्पष्ट होते. मस्ती म्हणजे उत्कट, उत्सफूर्त अतितरल जीवनेच्छा. मनुष्य तत्त्वांतून मातीला मस्तीचा स्पर्श व्हावा लागतो. तेव्हाच मातीला 'मस्तानी' चे रूप येते. मस्तानी म्हणजे अतितरल आरासपानी सौंदर्य जगण्याची तीव्र आसक्ती निर्माण करणारी शक्ती, डोळे, बाहू, मांडया, छाती ही मस्तीची संवेदन अंगे. यांमुळे पुरूषमनाची संवेदना जागृत होते. मूळचे पुरूषमन मोहमयी बनते. रेग्यांना मातीमध्ये प्रकृतीची संवेदन अंगे जागृत झाल्याचे दिसतात. म्हणून मातीला स्त्रीचे रूप म्हटले आहे. जणू आदिमायाच दृष्टीस पडते. मस्ती मातीच्या विस्तीर्ण रूपांत रूपांतरीत होते. एक सीमिताचा नि:सीम विकास म्हणजे स्त्री पृथ्वीच्याच देहरूपांत सामावून जाते.

***संदर्भ :***

१.सुलभा हेर्लेकर – प्रीती आणि प्रतिमा
२.राजशेखर शिंदे – पु.शि. रेगे यांच्या समग्र वाङ्मयाचा अभ्यास : शिवाजी विद्यापीठ अप्रकाशित विद्यावाचस्पती प्रबंध, २००५



**Koti Santosh Vijaykumar**
Assistant Professor

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.net